# Good Work प्रेसनोट – दिनांक २३/०३/२०१९

**<u>विषय</u>**- पुणे सिटीझन्स अवेअरनेस फोरम आयोजित शहीद दिवस अभिवादन सभा कार्यक्रम घेतले बाबत.

---

पुणे सिटीझन्स अवेअरनेस फोरम आयोजित **शहीद दिवस अभिवादन सभा** हा कार्यक्रम युनिटी बेकरी चौक,मार्केटयार्ड, पुणे याठिकाणी आज दिनांक २३/०३/२०१९ रोजी सकाळी ०८/३० ते १०/०० वा.चे दरम्यान घेण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे-संजय भंडारे (प्रसिद्ध इतिहासकार),मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी एस.निंबाळकर ,राजन बेडके,एक्साईज अधीक्षक (रिटायर्ड) तसेच सर्व स्तरातील मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रसिद्ध इतिहासकार संजय भंडारे यांनी शहीदांना अभिवादन करुन छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार,त्याचा आदर्श समाजाने घ्यावा याबाबत त्यानी शिवाजी महाराज यांचा इतिहास थोडक्यात सांगितला तसेच मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संभाजी एस.निंबाळकर यांनी समाजातील तरुण पिडीने थोर महापुरुषांचे विचार अंगी घेऊन त्याप्रमाणे काम करुन ते जनतेच्या मनात रुजवावेत तीच खरी त्यांना श्रद्धांजली असेल असे त्यांचे छोटेखानी भाषणात सागुन उपस्थितांची मने जिंकली.

सदर कार्यक्रमाला हद्दीतील नगरसेवक कविता वैरागे, प्रविण चोरबोले, श्रीनाथ भिमाले, राजश्री शिळीमकर, पीएसआय मनोज भोसले, पुणे सिटीझन्स अवेअरनेस फोरमचे इसाक मोमीन,राजु ओसवाल तसेच पुणे महानगरपालिकाकडील अधिकारी बाटे व वाघमारे यांचेसह एकुण ७० ते ७५ लोकांचा जनसमुदाय हजर होता.